RAJASTHAN PATRIKA, Ahmedabad, 18.1.2025
Page No. 4, Size:(14.58)cms X (6.20)cms.

बुलेट ट्रेन प्रोजेक्ट | आणंद व अहमदाबाद बुलेट ट्रेन स्टेशनों के बीच स्थित

# नडियाद के पास डभाण गांव में 210 मीटर लंबे पुल का निर्माण

पत्रिका न्यूज नेटवर्क
patrika.com



**आणंद.** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रोजेक्ट के लिए गुजरात के खेड़ा जिले में नडियाद के पास डभाण गांव में 210 मीटर लंबे पुल का निर्माण किया गया है। राष्ट्रीय राजमार्ग (एनएच) संख्या 48 (दिल्ली-चेन्नई) को पार करने के लिए डिजाइन किए गए इस प्री-स्ट्रेस्ड कंक्रीट (पीएससी) पुल का निर्माण पूरा किया गया। यह पुल आणंद और अहमदाबाद बुलेट ट्रेन स्टेशनों के बीच स्थित है। इस पुल में 72 प्रीकास्ट सेगमेंट शामिल हैं, जिनमें 40 मीटर, 65 मीटर, 65 मीटर, 40 मीटर के विन्यास के चार स्पैन हैं। इसे बैलेंस्ड कैंटिलीवर विधि का उपयोग करके बनाया गया है, जो बड़े स्पैन के लिए आदर्श है। गत 11 जनवरी तक परियोजना की स्थिति के अनुसार 253 किलोमीटर वायाडक्ट और 290 किलोमीटर गर्डर कास्टिंग का काम पूरा हो चुका है। साथ ही 358 किलोमीटर पियर का कार्य हो चुका है। 13 नदियों पर पुल और पांच स्टील पुल बन चुके हैं। लगभग 112 किलोमीटर के हिस्से में नॉइज़ बैरियर लगाए गए हैं। गुजरात में कई स्थानों पर ट्रैक निर्माण कार्य भी शुरू हो गया है। महाराष्ट्र में बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स (बीकेसी) और ठाणे के बीच 21 किमी सुरंग का काम जारी है। एनएटीएम के माध्यम से महाराष्ट्र के पालघर जिले में 7 पर्वतीय सुरंगों का निर्माण किया जा रहा है। गुजरात के वलसाड जिले में एक पर्वतीय सुरंग बनकर तैयार हो चुकी है।

GUJARAT GUARDIAN, Surat, 14.1.2025
Page No. 2, Size:(4.70)cms X (5.27)cms.

## Bridge ready at Dabhan village of Kheda over the bullet train project highway



# બુલેટ ટ્રેન પ્રોજેક્ટનો હાઈવે ઉપરનો ખેડાના ડભાણ ગામે પુલ તૈયાર

**સુરતઃ** અમદાવાદ-મુંબઇ બુલેટ ટ્રેન પ્રોજેક્ટમાં નેશનલ હાઇવે પર વધું એક 210 મીટર લાંબો પુલ તૈયાર થઇ ગયો છે. આ પુલ ખેડા જિલ્લાના ડભાણ ગામ ખાતેથી પસાર થઇ રહ્યો છે. ગુજરાતના ખેડા જિલ્લામાં નડિયાદ નજીકના ડભાણ ગામમાં નેશનલ હાઇવે-48 (દિલ્હી-ચેન્નઇ) ને પાર કરવા માટે રચાયેલ 210 મીટર લાંબો PSC (પ્રી-સ્ટ્રેસ્ડ કોંક્રિટ) પુલ તૈયાર થઇ ગયો છે. આ પુલ 40 m + 65 m + 65 m + 40 m રૂપરેખાંકનના ચાર સ્પાન્સ સાથે 72 પ્રીકાસ્ટ સેગમેન્ટ્સ ધરાવે છે અને તે સંતુલિત કેન્ટીલીવર પદ્ધતિનો ઉપયોગ કરીને બાંધવામાં આવે છે, જે મોટા સ્પાન્સ માટે શ્રેષ્ઠ છે. આ બ્રિજ આણંદ અને અમદાવાદ બુલેટ ટ્રેન સ્ટેશન વચ્ચે આવેલો છે.

NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd.

LOKSATTA, Mumbai, 14.1.2025
Page No. 4, Size:(12.53)cms X (8.29)cms.

**Construction of 210 meters long bridge completed**

# २१० मीटर लांबीच्या पुलाचे बांधकाम पूर्ण

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गातील पुलांच्या कामाला वेग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई-अहमदाबाद शहरांतील दळणवळणाचा वेग वाढवण्यासाठी नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एनएचएसआरसीएल) देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम केले जात आहे. या मार्गातील पुलाचे काम वेगाने सुरू असून नुकताच गुजरातमधील खेडा जिल्ह्यात २१० मीटर लांबीचा पूल बांधण्यात आला आहे.

मुंबई ते अहमदाबाद दरम्यान ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेनचे काम सुरू आहे. या प्रकल्पासाठी महाराष्ट्र, गुजरात, दीव-दमण येथे पायाभूत सुविधा उभ्या केल्या जात आहेत. आतापर्यंत १३ नद्यांवरील पूल आणि पाच स्टीलचे पूल पूर्ण झाले आहेत. गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील नडियादजवळील दाभान गावात राष्ट्रीय महामार्ग ४८ (दिल्ली-चेन्नई) ओलांडण्यासाठी २१० मीटर लांबीच्या प्रीस्ट्रेस्ड काँक्रीट पुलाचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले. हा पूल आणंद आणि अहमदाबाद बुलेट ट्रेन स्थानकांदरम्यान आहे. तेथे वलसाड जिल्ह्यातील पंचलाईजवळील वाघलधारा गावात राष्ट्रीय महामार्ग ४८ वर पूल बांधण्यात आला आहे. गुजरातमध्ये अनेक ठिकाणी ट्रॅक बांधण्याचे काम सुरू झाले असून महाराष्ट्रात वांद्रे-कुर्ला संकुल आणि ठाण्यादरम्यान २१ किमी बोगद्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड (एनएटीएम) च्या माध्यमातून सात डोंगरी बोगदे खोदले जात आहेत. गुजरातमधील वलसाड जिल्ह्यात एक डोंगरी बोगदा पूर्ण झाला आहे.



### मार्गाच्या दोन्ही बाजूला ध्वनी अवरोधक

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनमुळे ध्वनी प्रदूषण होऊ नये, यासाठी या मार्गावर ध्वनी अवरोधक बसवण्यात आले आहेत. या मार्गाच्या ५०८ किमीपैकी आतापर्यंत ११२ किमी परिसरात ध्वनी अवरोधक बसवले. बुलेट ट्रेन नागरी भागातून जात असताना प्रचंड ध्वनिप्रदूषण होण्याची शक्यता आहे. ट्रेनच्या खालच्या मुख्यतः रुळाच्या घर्षणाने येणाऱ्या कर्कश आवाजाने आरोग्यावर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे बुलेट ट्रेन मार्गाच्या दोन्ही बाजूला ध्वनी अवरोधक बसवून आवाज कमी केला जाईल, अशी माहिती नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिली.

PRAHAAR, Mumbai, 15.1.2025
Page No. 1, Size:(11.99)cms X (4.78)cms.

**210 m long bridge in Kheda district for bullet train**

# बुलेट ट्रेनसाठी खेडा जिल्ह्यात २१० मीटर लांबीचा पूल

◆ प्रशांत सिनकर

**ठाणे :** बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम गुजरात व महाराष्ट्रात अति वेगाने सुरू झाले आहे. बीकेसी - ठाणे दरम्यान २१ किमी बोगद्याच्या कामाबरोबर पुढे पालघर जिल्ह्यातून धावणाऱ्या बुलेट ट्रेनसाठी सात डोंगरी बोगदे बांधण्यात येणार असून, वलसाडमध्ये डोंगरी बोगदा बांधून तयार होत असताना, गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर २१० मीटर लांबीचा पूल बांधण्यात आला आहे.

## बीकेसी - ठाणे दरम्यान २१ कि. मी. बोगद्याचे काम सुरू



- २५३ कि.मी. वायडक्ट, २९० कि.मी. गर्डर कास्टिंग आणि ३५८ कि.मी. पिअरचे काम पूर्ण झाले आहे.
- १३ नद्यांवर पूल आणि पाच स्टील पूल पूर्ण झाले आहेत.
- अंदाजे ११२ कि.मी. लांबीवर ध्वनी अडथळे स्थापित केले गेले आहेत.
- गुजरातमध्ये अनेक ठिकाणी ट्रॅक बांधण्याचे काम सुरू झाले आहे.
- महाराष्ट्रात बीकेसी आणि ठाणे दरम्यान २१ कि.मी. बोगद्याचे काम सुरू आहे.
- महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात सात डोंगरी बोगदे बांधले जात आहेत.
- गुजरातमधील वलसाड जिल्ह्यात एक डोंगरी बोगदा पूर्ण झाला आहे.

भारतात बुलेट ट्रेन धावेल ही गोष्ट स्वप्नवत वाटत असली तरी वास्तवात बुलेट ट्रेनचे काम जलद गतीने सुरू आहे. मुंबईतून बीकेसी येथून धावणारी बुलेट ट्रेन अहमदाबाद शहराशी जोडली जाणार आहे. आव्हानात्मक असणारा प्रकल्प आता मार्गी लागत असून, कुठे मोठ्या नद्या तर कुठे डोंगरी भाग या सर्वांना छेद देऊन प्रकल्प मार्गी लागत आहे. यामधील गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील नडियादजवळील दाभान गावात राष्ट्रीय महामार्ग-४८ (दिल्ली-चेन्नई) ओलांडण्यासाठी डिझाइन केलेला २१० मीटर लांबीचा पीसीएस (प्री-स्ट्रेस्ड कॉंक्रीट) पूल बांधून पूर्ण झाला.

ब्रिजमध्ये ४० मी. + ६५ मी + ६५ मी + ४० मी कॉन्फिगरेशनच्या चार स्पॅनसह ७२ प्रीकास्ट विभागांचा समावेश आहे आणि तो बॅलेंस्ड कॅन्टीलिव्हर पद्धती वापरून बांधला गेला आहे. हा पूल आनंद आणि अहमदाबाद बुलेट ट्रेन स्थानकांदरम्यान आहे.